# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १५९ वा गुरूवार दि.०५ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# सत्ता असो की नसो आशियाना व बाभळगाव निवासस्थान लातूरकरांच्या कायम सेवेसाठी खुली माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा विश्र्वास

## आशियाना बंगल्यावर कार्यकर्ते पदाधिकारी यांची गर्दी

**ग्रामीण मतदार संघातील अनेकांना अश्रू**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून काँग्रेस उमेदवार आमदार धीरज देशमुख यांचा थोडक्या मतांनी अनपेक्षित पराभव झाल्याने गेली दोन दिवस आशियाना बंगल्यावर माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्याकडे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी सामान्य माणूस मतदार धीरज देशमुख यांचा पराभव झाल्याने कार्यकर्ते पदाधिकारी यांना अश्रू अनावर झालेले दिसत होते.





लातूर / प्रतिनिधी :- राज्यातील सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहिण योजना सारख्या विविध योजना राबवून सरकारचा पैसा लोकांना दिला त्या अशा अनेक योजनांमुळे राज्यांत एकंदर कौल सत्ताधाऱ्यांना मिळाला असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून काँग्रेस उमेदवार आमदार धीरज देशमुख यांचा पराभव झालेला नाही तर केवळ आपणच कुठे तरी कमी पडलो असे सांगून आपल्या उमेदवाराला १ लाख ५ हजार मतदान मिळालेले असून मतदार संघातील पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मेहनतीने कार्य केले आहे त्यामुळें आपण ना उमेद न होता आगामी काळात काँग्रेसच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांनी कार्य करावे असे सांगून सत्ता असो वां नसो मात्र आम्ही लातूरकरांच्या सेवेसाठी बाभळगाव व आशियानाचे दारे खुली आहेत असा विश्र्वास राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी येथे बोलताना व्यक्त केला ते बुधवारी आशियाना निवासस्थानी लातूर लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मातंग समाजातील प्रमुख पदाधिकारी असलेल्या शिष्टमंडळाने माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांची भेट घेतली विधानसभा निवडणुकीतील केलेल्या कार्याची माहिती दिली त्यावेळीं ते बोलत होते सत्ता कुणाचीही असली तरी मंत्रालयात आमचे वजन लोकनेते विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री असताना सत्ताधारी पक्षाचे लोक विरोधी पक्षात असताना सर्वांचे काम करायची ही आठवण आजही मंत्रालयात टिकून आहे त्यामुळे जनतेच्या सेवेसाठी मंत्रालयात कुणाचीही सत्ता असली तरीही लातूरच्या देशमुखांचे पत्र व एक फोन गेला तर लोकांची कामे होतात त्यामुळे सत्ता नाही कामे होणार नाही असे समजू नका तसेच आपल्या उमेदवाराला मतदारांनी १ लाख ५ हजार लोकांनी मतदान केले त्यांच्यासाठी व सर्वासाठी आगामी काळात सर्वांचे काम करू असा विश्वास माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केला आहे

मातंग समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार

लातूर ग्रामीण मतदार संघात मातंग समाजातील पदाधिकाऱ्यांनी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले असून त्या कार्याची दखल घेऊन समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असून त्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू असा शब्द माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी दिला यावेळी मारूती महाराज साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष गणपतराव बाजूळगे व्हॉईस चेअरमन सचिन पाटील,काँग्रेस मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष हरिराम कुलकर्णी, मारुती महाराज साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष उदयसिंह देशमुख,माजी सभापती बबनराव देशमुख, रामदास पवार प्रा.गोविंद घार विविध संस्थांचे पदाधिकारी काँग्रेसचे कार्यकर्ते पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते

यावेळी मातंग समाजातील अंगद वाघमारे सोनवती, डॉ दिनेश नवगिरे (मुरुड) अमोल देडे (गोदेगाव) आपा देडे (गोंदेगाव) राजेंद्र मस्के, जगण चव्हाण (मुरुड) सचिन कांबळे (तांदुळजा) राजाभाऊ प्रसाद आनंतवाड दिनेश ढोबळे (बोरी) शंकर शिंदे (भातांगळी) रसाळ (निवळी) ामलींग भडगे दिलीप भंडगे (चिंचोली ब ) दता देडे नितीन देडे (रामेगाव) संजय हजारे (भादा) संपत गायकवाड (काळमाथा) सुभाष गायकवाड (पोहरेगाव) कल्याण शाहिर (डिगोळ देशमुख) सिध्देश्वर गालफाडे (पानगाव) महादेव शिरसाठ (भंडारवाडी) सुभाष शिरसाठ (गोविंदनगर) परमेश्वर सुर्यवंशी तानाजी सुर्यवंशी (धवेली) नागनाथ डोंगरे (तळणी) प्रकाश वाघमारे (निवाडा)येथील

लातुर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मातंग समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्याने माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख साहेब यांची भेट घेऊन यावेळी आपले मनोगत व्यक्त केले

# व्यवसाय प्रमाणपत्र देण्यासाठी लातूर शहरात सर्वेक्षण सुरू

लातूर/प्रतिनिधी :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये लातूर शहर महापालिका क्षेत्रात व्यावसाय करणा-या व्यापा-यांकडे व्यवसाय परवाना प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने मा. सर्वसाधारण सभा दि. १३/१०/२०१७ विषय क्रं. ०८ ठराव क्रं. २५ व मा. स्थायी समिती सभा दि. २४/१०/२०१८ विषय क्रं. ०४ ठराव क्रं. ६३ व मा. आयुक्त महोदय यांनी गठीत केलेली समितीने दि. १४/०२/२०२३ रोजी बैठकीमध्ये दर निश्चिती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने व्यावसाय प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शहरात सर्वेक्षण सुरू करण्यात येत आहे. शहरात मोठ्या प्रमाणामध्ये लहान-मोठे व्यावसायीक आहेत. परंतू अनेक व्यावसायीक महापालिकेच्या व्यवसाय परवान्यायविनाच आपला व्यवसाय करत आहेत. परिणामी महापालिकेचे उत्पन्न / महसूल मिळत नाही. महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला असल्यामुळे त्याचा परिणाम विविध विकास कामे राबविताना दिसून येतो. त्याअनुषंगाने लातूर शहर महानगरपालिकेमार्फत शहरात व्यतवसायीकांचे सर्वेक्षण करण्यासाठी अमरावती येथील सिमॅक आय.टी.प्रा.लि. या संस्थेला काम देण्यात आले आहे. या संस्थेमार्फत शहरातील सर्व छोटे - मोठे व्यवसायीकांना परवाना प्रमाणपत्र देण्यासाठी संपूर्ण प्रक्रिया राबविण्यासाठी सर्व्हेक्षण सुरु करण्यात येत आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्या नंतर मुख्य कार्यालयासह क्षेत्रिय कार्यालयातून शुल्क आकारून व्यवसाय प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# केज उपजिल्हा रुग्णालयात पत्रकारांची आरोग्य तपासणी संपन्न मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरात राबविण्यात येतो हा उपक्रम





केज/प्रतिनिधी मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापनदिना निमित्ताने राज्यातील सर्व पत्रकारांची आरोग्य तपासणी केली जाते. यावर्षी दहा हजार पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याची संकल्पना परिषदेचे विश्वस्त मा. एस. एम. देशमुख सर यांनी मांडली होती. याच अनुशंगाने केज येथे सर्व पत्रकार बांधवांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

धावपळीच्या जिवनात पत्रकारांनी आपली काळजी घ्यावी, दरवर्षी आरोग्य तपासणी करून काही समस्या असल्यास वेळेत उपचार सुरु करून आपले जीवन सुरक्षित करावे यासाठी हा उपक्रम राबविला जातो. तसेच पत्रकारांना काही आजाराची लक्षणे दिसून आले तर पुढील उपचारासाठी परिषदेच्या वतीने सर्व सहकार्य केले जाते. ३ डिसेंबर मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त केज येथील उपजिल्हा रुग्णालयात पत्रकारांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात केज तालुक्यातील सर्व पत्रकारांनु या आरोग्य शिबीरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली तपासणी करून घेतली.

उपजिल्हा रूग्णालय केज येथे पत्रकारांच्या आवश्यक सर्व तपासण्या करून सहकार्य केले गेले. वैद्यकीय अधिक्षक, डॉ. केंद्रे सर, डॉ. मुंडे सर, नागरगोजे सर व सर्व वैद्यकीय कर्मचारी, स्टाफ यांचा पत्रकारांच्या वतीने सत्कार करून आभार मानण्यात आले. यावेळी केज तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सर्व पदाधिकारी, सदस्य व सर्व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकारांच्या भावना दुखावणे हेतू नव्हता, दिलगीर आहे -खा बजरंग सोनवणे

खा. बजरंग सोनवणे यांनी केज येथील एका पत्रकार बांधवासह त्यांच्या कुटुंबावर अपशब्द वापरले आहेत. सदर प्रकरणी बीड जिल्ह्यासह राज्यातील पत्रकार बांधवांनी निषेध व्यक्त केलेल्याच्या दैनिक व चॅनलच्या माध्यमातून बातम्या प्रकाशित होताच खा. बजरंग सोनवणे यांनी एक प्रसिद्धी पत्रक काढून सदर प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली परंतु सदर दिलगिरी व्यक्त केले असता त्यावर केज येथील पत्रकार बांधव समाधानी नाहीत. खा. सोनवणे यांनी एका मंचावरून पत्रकार बांधव व त्यांच्या कुटुंबाविषयी अपशब्द वापरून पत्रकार बांधव व त्यांच्या कुटुंबाच्या भावना दुखावल्या आहेत.खा. सोनवणे यांनी एका मंचावरूनच किंवा पत्रकार बांधवांच्या समोर त्यांची व त्यांच्या कुटुंबाची माफी मागण्यात यावी असे मत केज येथील पत्रकार बांधवांनी व्यक्त केले आहे.



केज/प्रतिनिधी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना अनावधानाने आपले बाबद संशय निर्माण करणारी बातमी कुणाला संशय आला म्हणून केल्याचे आपण म्हटले. यावेळी आपण केज मतदार संघात जीवाचे रान करत प्रचार केला व प्रचार यंत्रणा सांभाळली असे असताना माझ्या भूमिकेवर संशय निर्माण करणारी बातमी देखील माझ्या सारख्या कार्यकर्त्यास मनस्ताप देणारी ठरली. यातून सदरील पत्रकार मित्राकडे तक्रार वजा बोलताना संशय आपणास का घरच्या कुणाला आला असे म्हटले गेले. यावेळी उल्लेख केलेल्या शब्दानी कुणाच्या भावना दुखावयात अशी आपली अजिबात इच्छा अपेक्षा नव्हती. मात्र याने माझ्या राजकीय प्रवासात माझ्या सोबत कायम राहिलेल्या माझ्या अनेक सहकारी मित्रांचे मन दुखावले. अश्या सर्व माझ्या मित्राकडे मी दिलगिरी व्यक्त करतो. माझ्या पत्रकार मित्राना दिलगिरी सोबतच हे आवाहन करतो की, आपण माझे टिकाकार सल्लागार आहात मी टिकेचे आणी सल्याचे नेहमी स्वागत करत आलोय पुढेही करणारच आहे. मात्र आपल्यातील निवडक मित्र ठरवून बदनामी संशय निर्माण करत असतील तर आपण पत्रकार म्हणून अश्या मित्रांना योग्य मार्गदर्शन करावे.मला विश्वास आहे आज ज्या प्रमाणे माझ्याकडे आपण व्यक्त झालात असेच भविष्यात चुकीच्या बातमीला बंध घालाल.बाकी मी माझ्या वक्तव्याने कुणाचे मन दुखावले बाबद दिलगिरी व्यक्त करत आहे.

आपला विश्वासू

खा. बजरंग सोनवणे

# मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीसच!



मुंबई : प्रतिनिधी गेल्या ११ दिवसांपासून सुरू असलेला महायुतीतील हायव्होल्टेज ड्रामा अखेर संपला आहे. देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळाचा नेता म्हणून निवड करण्यात आली. त्यामुळे फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. उद्या ५ डिसेंबर रोजी फडणवीस यांचा आझाद मैदानावर ग्रँड शपथविधी सोहळा होणार आहे. मुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीनंतर राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून फडणवीस राज्याचा कारभार सांभाळतील.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला. यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आणि भाजप हा सर्वांत मोठा पक्ष ठरला. निकालानंतर आता १० दिवस उलटून गेले आहेत. महायुतीमधील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी आपापल्या विधिमंडळ गटनेत्याची निवड केलेली आहे. पण सर्वांत मोठा पक्ष ठरलेल्या भाजपकडून विधिमंडळ गटनेता निवडण्यात आला नव्हता. याच पार्श्वभूमीवर भाजपकडून आज ४ डिसेंबर रोजी विधिमंडळ गटनेता निवडण्याची महत्त्वाची बैठक विधिमंडळात पार पडली.

महाराष्ट्रातील सत्तास्थापनेच्या हालचालींचा वेग या बैठकीपूर्वी भाजपच्या कोअर कमिटीची बैठक झाली. या बैठकीत भाजपचे वरिष्ठ नेते, केंद्रीय निरीक्षक विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन हे हजर होते. यावेळी गटनेतेपदासह विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. यानंतर विधान भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये भाजपच्या आमदारांची विधिमंडळ गटनेता निवडीची बैठक सुरू झाली. यावेळी सुधीर मुनगंटीवार आणि चंद्रकांत पाटील यांनी गटनेतेपदाचा प्रस्ताव मांडला. तर आशिष शेलार आणि रवींद्र चव्हाण यांनी या प्रस्तावावर अनुमोदन दिले. त्यानंतर अखेर भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची भाजपच्या विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. यानंतर आता महाराष्ट्रातील सत्तास्थापनेच्या हालचालींचा वेग आला आहे. केंद्रीय निरीक्षक विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांच्या उपस्थितीत विधिमंडळ पक्षनेतेपदी शिक्कामोर्तब करण्यात आले.

देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाल्यानंतर अखेर सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. आजच सत्ता स्थापनेचा दावा देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्यानंतर फडणवीस आजच राज्यापालांना सत्ता स्थापनेचे पत्र देणार असल्याचे सांगितले जात आहे. यावेळी फडणवीस यांच्यासोबत अजित पवार असण्याची शक्यता आहे. तर एकनाथ शिंदे हे फडणवीस यांच्यासोबत असतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि विजय रुपाणी हे भाजपचे दोन्ही निरीक्षक राजभवनावर शिष्टमंडळासोबत जाण्याची शक्यता आहे.

संपादकीय....

# बदललेल्या ऋतुचक्राची चिंता

ऋतूंचे अस्तित्व हवामान बदलामुळे संकटात सापडले आहे आणि त्याचवेळी प्रदूषण आपल्याला आजारी पाडणारे वातावरण तयार करत आहे. सर्वोच्च न्यायालय देखील यासारख्या मुद्द्यावर चिंता व्यक्त करत आहे.

सकाळ आणि सायंकाळी कानावर पडणारा पक्ष्यांचा किलबिलाट, सकाळी सकाळी अंगावर पडणारी सूर्याची कोवळी किरणे यासारख्या मनाला शांतता प्रदान करणार्या गोष्टी आता इतिहासजमा झाल्या आहेत. आता सकाळी पडते काळसर धुके, गुदमरून टाकणारा प्रदूषणाचा विळखा.

झील की कोखो से जहा झांकते थे
धूप से सोना मढे भाप छल्ले
वहा अब मंडराता है घना नीला कुहरा

हेमंतचे गीत गाताना कवी अज्ञेय यांनी कधीतरी या ओळीसह हेमंत ऋतूचे स्वागत केले होते. मात्र आता धुक्याचे सौंदर्य क्वचितच दिसत आहे. निसर्गाचे मनोहारी दृश्यच नाही तर आता हेमंत ऋतूचाही अनुभव येत नाही. कधीकाळी सहाही ऋतूचा अनुभव देणारे दिवस आता सरले. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर या ऋतूंमध्ये एक वेगळाच आनंद आणि उत्साह लोकांत पाहावयास मिळत होता. गुलाबी थंडीची चाहुल सर्वांनाच सुखावणारी असायची. मात्र आता हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा या तीनच ऋतूंचा प्रामुख्याने उत्तर भारतातील नागरिक अनुभव घेत आहेत.

हेमंत ऋतूचा विचार केला तर हवामान बदलामुळे पावसाळ्याचा कालावधी वाढत आहे. पूर्वी सप्टेंबरपर्यंत पाऊस थांबायचा आणि त्यानंतर थंडीची चाहुल लागायची. परंतु आता ऑक्टोबरपर्यंत पाऊस नित्याने हजेरी लावत आहे. यानंतर तापमान अचानक घसरते आणि ते एकप्रकारे हेमंत ऋतूला कवेत घेणारे ठरत आहे. वास्तविक या काळात १५ ते १६ अंश सेल्सियस तापमान राहताना दिसते, परंतु प्रदूषणामुळे थंडीचा स्पर्श झाला नाही. अशीच स्थिती वसंत ऋतूची देखील आहे. गेल्या तीन-चार वर्षांचा अनुभव पाहिला, तर मार्च ते एप्रिलपासूनच उष्णतेच्या झळा सुरू होतात. परिणामी वसंतचा तर अनुभव येतच नाही केवळ उन्हाची दाहकता वाट्याला येते.

प्रत्यक्षात मानवी हस्तक्षेपामुळे २०३० पर्यंत जागतिक तापमानात दीड अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. परंतु आताच जागतिक तापमानात १.१ किंवा १.२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ झाली आहे. या वाढीची तीव्रता एवढी आहे की भविष्यात दीड अंश सेल्सिअसपर्यंत तापमान वाढल्याने होणारा त्रास आताच होत आहे. प्रत्येक हंगामात त्याचे गांभीर्य कळत आहे. मग दीड अंशांनी वाढ झाल्यानंतर होणार्या स्थितीचा विचार न केलेला बरा. अर्थात अझरबैजान येथील बाकू येथे पार पडलेल्या कॉप-२९ हवामान बदल संमेलनात २०२४ च्या प्रारंभीच्या नऊ महिन्यांत जागतिक तापमान पूर्व औद्योगिक शतकाच्या सरासरी दीड अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदले गेल्याचे सांगण्यात आले. याच कारणामुळे हवामानाच्या तीव्रतेचा आपण अनुभव घेतला.

अडचणीची बाब म्हणजे अशा प्रकारचे अहवाल जारी केले जातात किंवा परिषदांचे आयोजन केले जाते, तेव्हा सर्वच जण पर्यावरणवादी होऊ लागतात आणि सजग होतात. प्रत्यक्षात सर्वकाही आटोपल्यानंतर सर्वजण शांत होतात आणि अहवालही थंडबस्त्यात जातो. २०१७ मध्ये हवामान बदलावर एक सरकार अंतर्गत पॅनलने (आयपीसीसी) आपल्या अहवालात, हिवाळ्यात तुलनेने तापमान अधिक राहत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे पूर्वीपेक्षा लोकांना कमी थंडी जाणवत आहे. मात्र सध्या अचानक प्रमाणापेक्षा अधिक थंडी जाणवते आहे. अर्थात, यामागे जागतिक तापमान कारणीभूत असून त्यात प्रदूषणाचा देखील मोठा वाटा आहे. परंतु या अहवालाकडे कोणीच लक्ष दिले नाही. परिस्थिती अजून 'जैसे थे'च आहे. प्रत्यक्षात हिवाळ्यात गंगा नदीच्या किनार्यावर वातावरण स्थिर असते. ही स्थिती पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतानसारख्या देशांतही दिसते.

या स्थिर वातावरणात कदाचित कमी दाबाचा पट्टा तयार झाला, तर हवामानात उलथापालथ होते. परंतु असे चित्र कधीतरीच पाहवयास मिळते. पण या स्थिर वातावरणामुळे प्रदूषण घुटमळत राहते. वास्तविक भारताच्या उत्तर भारतात प्रदूषण ही बारमाही समस्या आहे. उन्हाळ्यात हवा गरम झाल्याने ती वर जाते आणि त्यामुळे प्रदूषणाला कारणीभूत असलेले घटक विखुरले जातात आणि हवेची गुणवत्ता ङ्गारशी ढासळत नाही; परंतु हिवाळ्यात हवामान स्थिर राहात असल्याने प्रदूषणाची घनता वाढत जाते. उर्वरित कसर पंजाब, हरियाणातील शेतकरी शेतातील कचरा जाळून आणि ङ्गटाके ङ्गोडून भरून काढतात. दाट धुके आणि प्रदूषणाचे घटक हे एकत्र येऊन काळसर धुक्याची चादर तयार करतात आणि त्यामुळे गुदमरणारे वातावरण तयार होते. श्वसनाला त्रास होऊ लागतो. विचार करा, दिल्लीच्या हवेतील गुणवत्तेचा निर्देशांक महिनाभर ४०० ते ५०० राहात असेल तर दिल्लीकर जीवघेण्या आजाराला सामोरे जातील नाही तर आणखी काय होईल.

शेवटी या समस्येचे समाधान काय? जेथे प्रदूषणाला खतपाणी घातले जाते, तेथेच त्याचे उत्तर, समाधान आहे. सर्वात पहिले म्हणजे वाळलेली पाने आणि शेणाच्या गोवर्यांचा इंधनाच्या रुपातून होणारा वापर थांबविला पाहिजे. आता गावागावात एलपीजी गॅस पोचला आहे. परंतु आजही गरीब ग्रामस्थांसाठी तुलनेने गॅस महागच आहे. तसेच कचर्यांचे डोंगर हटविले पाहिजे. राजधानीत असे अनेक प्रकारचे डोंगर असून तेथून मिथेनसारखे धोकादायक गॅस बाहेर पडत असतात. त्यांना बाजूला करण्याबरोबरच सर्व कॉलनी आणि सोसायट्यांना देखील स्थानिक पातळीवर कचर्याचे निर्मूलन करण्यासाठी कॅप्टिव्ह सीव्हेज ट्रिटमेंट प्लँट आणि कॅप्टिव्ह वेस्ट मॅनेजमेंट प्लँट (कचरा व्यवस्थापन) देखील उभारावा लागणार आहे. त्यामुळे घरातला कचरा परिसरातच नष्ट केला जाईल.

मोटारगाड्यांपासून होणार्या प्रदूषणाला देखील रोखावे लागेल. सार्वजनिक परिवहनाच्या आघाडीवर देशभरात काम सुरू आहे. परंतु खासगी वाहतुकीत सुधारणा करण्याची वेळ आली आहे. यासाठी रस्त्यावर डीझेलचे वाहने थांबविणे गरजेचे आहे. परिवहनातून होणार्या प्रदूषणात डीझेलचे मोठे योगदान आहे आणि शहरात अशा मोटारगाड्यांची संख्या लक्षणीय आहे. कार पुलिंग देखील करता येऊ शकते. यानुसार परिवहनात शिस्त आणली तर तीस टक्क्यांपर्यंत प्रदूषणात घट होऊ शकते. तसेच हिवाळ्यात हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आदी भागातील औष्णिक विद्युत केंद्र (कोळशावर चालणारे) बंद करायला हवेत.

म्हणजे १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबरपर्यंत कोळशापासून होणारी वीजनिर्मिती थांबविली पाहिजे. या निर्णयामुळे वीजपुरवठ्यावर काही परिणाम होणार नाही. कारण या काळात विजेची मागणी बर्यापैकी कमी झालेली असते आणि प्रसंगी त्याची उणीव शेजारील राज्यांतूनही पूर्ण करता येणे शक्य आहे. त्यामुळे दिल्लीच्या वातावरणात बाहेरून येणार्या प्रदूषणातील ३० टक्के प्रमाण कमी करू शकतो. शेतातील कचरा आणि ङ्गटक्यावर काम सुरूच आहे. म्हणजे यानुसार आपण प्रदूषणाची पातळी बर्यापैकी कमी करू शकतो. परंतु या गोष्टी होणार कशा, हा खरा प्रश्न आहे. हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाची (सीएक्यूएम) स्थापना करण्यात आली. परंतु जोपर्यंत राज्ये सहकार्य करणार नाहीत, तोपर्यंत हा आयोग काहीच करू शकणार नाही.

# जीडीपीचा नीचांक; महागाईचा उच्चांक

आज पुरेशी मागणी नाही आणि व्याजदरही जास्त असताना, उद्योगपती कर्जउभारणी मर्यादित करणार, हे स्पष्ट आहे. म्हणूनच अर्थगती वाढवण्याची जबाबदारी पुन्हा एकदा सरकारवरच येऊन पडली आहे!

देशाचा आर्थिक विकासदर चालू आर्थिक वर्षाच्या जुलै ते सप्टेंबर यादरम्यान दोन वर्षांच्या नीचांकी पातळीपर्यंत, म्हणजे ५.४ टक्क्यांपर्यंत घसरला असून, याची केंद्र सरकाला दखल घ्यावीच लागेल. शहरी ग्राहकांची घटलेली मागणी आणि उत्पादन तसेच खाणकाम क्षेत्राच्या निराशाजनक कामगिरीमुळे अर्थव्यवस्थेची वाढ खुंटलेली दिसते. परंतु तरीही सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, हे बिरूद देशाने कायम राखले आहे.




आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत जीडीपी म्हणजे सकल देशांतर्गत उत्पादनातील वाढ ८.१ टक्के राहिली होती. तर एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत हा दर ६.८ टक्क्यांवर होता. तर शुक्रवारी जाहीर झालेल्या दुसर्या तिमाहीचा दर हा रिझर्व्ह बँकेच्या ७ टक्के अनुमानाच्या तुलनेत तब्बल दीड टक्क्याहून अधिक मंदावला आहे, ही नक्कीच काळजी करावी अशी बाब आहे. या आधी ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ दरम्यान जीडीपी वाढीचा दर ४.३ टक्क्यांचा नीचांक नोंदवण्यात आला होता.

राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार, कृषी क्षेत्राच्या वाढीचा वेग वर्षापूर्वीच्या १.७ टक्क्यांवरून सरलेल्या जुलै-सप्टेंबर तिमाहीत दुपटीने वाढून, ३.५ टक्क्यांवर पोहोचला आहे. परंतु उत्पादन क्षेत्राची कामगिरी सुमार राहिली असून, दुसर्या तिमाहीत विकासवेग २.२ टक्क्यांवर आक्रसला आहे. मागील वर्षाच्या याच कालावधीत तो १४.३ टक्क्यांवर गेला होता. म्हणजे उत्पादन क्षेत्राची संपूर्णपणे घसरगुंडी झालेली दिसते. शिवाय खाण आणि उत्खनन क्षेत्रातील कामगिरी गेल्या वर्षी सप्टेंबर तिमाहीअखेर ११.१ टक्के अशी दुहेरी अंकात राहिली होती. त्या तुलनेत ती यंदाच्या सप्टेंबर तिमाहीत जेमतेम ०.१ टक्क्यांवर आली आहे. शेती क्षेत्रातून जास्तीत जास्त लोकांना बाहेर काढून त्यांना उत्पादन क्षेत्रात स्थलांतरित करण्याचे धोरण आहे. कारण शेती आतबट्ट्याची असल्यामुळे त्यावर लोकांचे पोट भरत नाही.

अर्थव्यवस्थेत समाधानकारक विकास होत आहे, तो सेवा क्षेत्राचा. वित्त, गृहनिर्माण आणि व्यावसायिक सेवांच्या वाढीचा दर गेल्या तिमाहीत ६.७ टक्के राहिला, जो मागील वर्षीच्या ६.२ टक्के होता. त्याउलट वीज, गॅस, पाणीपुरवठा आणि इतर उपयुक्तता सेवांमध्ये ३.३ टक्क्यांची वाढ झाली आहे. ज्यात वर्षापूर्वीच्या १०.५ टक्क्यांच्या तुलनेत निम्म्याहून अधिक घट झाली आहे. वीज आणि पाणीपुरवठ्याचा वापर कमी झाला आहे. याचा अर्थ व्यवसाय-उद्योगांची गती समाधानकारक नाही. बांधकाम क्षेत्राच्या वाढीचा वेगही निम्म्यावर आला आहे. खरिपाच्या उत्पादनात भरघोस वृद्धी झाली असून, रब्बी पिकांच्या हंगामाबद्दल आशा आहेत. अर्थातच यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि मागणी यांच्यात सुधारणा अपेक्षित आहे.

आता या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या चार महिन्यांत केंद्र सरकारने भांडवली खर्च वाढवल्यास, जीडीपीत आणखी वाढ होऊ शकेल. तसे झाले तरच संपूर्ण वर्षात ६.५ ते ६.७ टक्के हा विकासदर गाठता येईल. खरे तर जीडीपीची वाढ ५.४ टक्क्यांवर येणे, म्हणजेच मंदीचे प्रमाण अपेक्षेपेक्षा जास्त आहे, असे दिसते. केंद्र आणि राज्यांचा एकत्रित भांडवली खर्च पहिल्या सहा महिन्यांत अनुक्रमे १५ टक्के आणि ११ टक्क्यांनी घसरला आहे. हा खर्च कमी झाल्याचा परिणाम सर्वच क्षेत्रांवर झाला आहे. खासगी क्षेत्रातून गुंतवणूक आटली असताना निदान सरकारचा भांडवली खर्च लक्षणीयरीत्या वाढणे जरुरीचे होते.

मुळात देशातील किरकोळ महागाईचा दर ऑक्टोबरमध्ये ५.५ टक्के होता. प्रामुख्याने खाद्यवस्तूंच्या महागाईमुळे हा चलनफुगवटा झाला. या चलनवृद्धीमुळे नजीकच्या भविष्यातही व्याजदर कपात करणे रिझर्व्ह बँकेला शक्य नाही. किरकोळ महागाई दराची स्वीकारार्ह मर्यादा चार टक्के इतकी आहे. पण त्यापेक्षा दीड टक्के जास्त महागाई सध्या आहे. भाववाढ आटोक्यात न आल्यास, व्याजदर कपात होणार नाही आणि कमी व्याजात कर्जे मिळाली नाहीत, तर कारखानदार उत्पादन कसे काय वाढवू शकतील? महागाई प्रचंड असताना व्याजदर कपात केली, तर खर्च आणि उपभोग प्रवृत्तीस प्रोत्साहन मिळते. मागणी वाढल्यानंतर तिचा फायदा घेण्याकरिता भावही वाढवले जातात आणि त्यामुळे महागाई आणखी आकाशाला जाऊन भिडते. याउलट व्याजदर वाढवून कर्ज महाग केल्यास अर्थव्यवस्थेतील चलन तरलता कमी होते.

देशातील उद्यमशीलता आणि मागणीस प्रोत्साहन मिळण्यासाठी कर्ज काही प्रमाणात स्वस्त होणे गरजेचे असते. परंतु चलनवृद्धीला लगाम घालणे शक्य होत नसल्यामुळे रिझर्व्ह बँक कात्रीत सापडली आहे. भाववाढ रोखण्याच्या धडपडीत विकासही कुंठित होण्याची भीती आहे. २०२३-२४ च्या तिसर्या तिमाहीत भारताने ८.४ टक्के इतकीच जीडीपी वाढ नोंदवली. परंतु सकल मूल्यवृद्धीचे (ग्रॉस व्हॅल्यू ॲडिशन) प्रमाण ६.५% इतकेच होते. आजही या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही.

गेल्या वर्षी विमानतळे, बंदरे, रस्ते, रेल्वे या क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च करून, अर्थव्यवस्थेचा गाडा ओढण्याची जबाबदारी सरकारने पार पाडली. शिवाय लोकसभा निवडणूक व्हायची असल्यामुळे सरकार अधिक गतीने काम करत होते. खासगी क्षेत्र त्या प्रमाणात गुंतवणूक करत नसल्यामुळे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास हे सतत खासगी क्षेत्रास भांडवली गुंतवणूक वाढवण्याचे आवाहन करत होते.

# हात द्या, साथ द्या!

'मेक इन इंडिया' तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा 'चेंज इन इंडिया' असेल, जे समाजाच्या सर्व घटकांसाठी सर्वसमावेशक असेल. शारीरिक मर्यादा असूनही दिव्यांग व्यक्ती आपल्यातील आत्मविश्वासाने सर्वांच्या बरोबरीने आपली योग्यता सिद्ध करतील तेव्हाच खर्या अर्थाने दिव्यांग अधिकार कायद्याचे अस्तित्व लक्षात येईल. आज जागतिक दिव्यांग दिन.
त्यानिमित्ताने

दिव्यांगांना समान संधी मिळणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षणासाठी १९९५ मध्ये कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर वीस वर्षांनी २०१६ मध्ये सुधारित दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा आला. दिव्यांगांच्या शारीरिक मर्यादा लक्षात घेता बदलत्या परिस्थितीनुसार केवळ नोकरी हे आर्थिक पुनर्वसनाचे माध्यम होऊ शकत नाही. त्यामुळे स्वयंरोजगाराद्वारे दिव्यांगांचे आर्थिक पुनर्वसन होण्यासाठी शासकीय, निमशासकीय तसेच खासगी क्षेत्रातील आस्थापनांमध्ये दिव्यांगांना सुयोग्य पदांमध्ये असलेल्या राखीव आरक्षणाबरोबरच दिव्यांगांच्या कौशल्यानुसार रोजगार व स्वयंरोजगाराद्वारे आर्थिक पुनर्वसन करणे आवश्यक आहे.



दिव्यांगांना स्वयंसेवी संस्थांमार्फत मोफत व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात निवासी तसेच अनिवासी ११३ अनुदानित विशेष कार्यशाळा कार्यरत असून यामध्ये एकूण ५ हजार ५३५ विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. या कार्यशाळेत १८ ते ४५ वर्षांपर्यंत अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग व गतीमंद दिव्यांगांना वेगवेगळ्या व्यवसायाचे दिव्यांगत्वानुसार प्रशिक्षण दिले जाते. निवासी विद्यार्थ्यांना निवास व भोजनाची विनामूल्य सुविधा पुरवल्या जातात. तसेच स्वयंसेवी संस्थेच्या कर्मचार्यांना वेतन, भाड्याच्या इमारतीचे भाडे, दहा महिन्यांसाठी परिपोषणासाठी अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग प्रतिविद्यार्थी रुपये १५०० तर मतिमंद प्रवर्गासाठी रुपये १६५० याशिवाय इतर खर्चासाठी वेतनेतर अनुदान शासनामार्फत दिले जाते.

या कार्यशाळांमधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याची कोणीही निश्चित खात्री देत नाही. कारण कार्यशाळा प्रशिक्षण केंद्राच्या संहितेनुसार प्रशिक्षणाचे व्यवसाय कोर्स हे कमी तंत्रज्ञान असलेले कुशल व अकुशल स्वरूपाचे असावेत. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाने विविध प्रवर्गातील दिव्यांगांसाठी निवडलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातील ट्रेड तसेच इतर काही ट्रेडचे प्रशिक्षण येथे दिले जाते. केवळ कुशल व्यवसायासाठी तंत्रशिक्षण विभागाची मान्यता घेणे अनिवार्य आहे. अकुशल व्यवसायासाठी वेगळ्या मान्यतेची गरज नाही.

गतिमंद व स्वमग्न दिव्यांगांसाठी अकुशल व्यवसाय ट्रेडची निवड ठीक आहे; परंतु अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग दिव्यांगांसाठी जर अकुशल व्यवसाय ट्रेड दिले तर रोजगाराचं काय? दिव्यांग विद्यार्थी निवासी कार्यशाळेत असतो तोपर्यंत एका विद्यार्थ्याला अंदाजे सरासरी ६० ते ७० हजार वार्षिक खर्च सरकार करते मात्र आजपर्यंत बाहेर पडलेल्या किती विद्यार्थ्याला घेतलेल्या प्रशिक्षणाचा फायदा झाला याबाबत सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजनेंतर्गत १ लाख ५० हजार व्यवसायाकरिता ८० टक्के बँकेमार्फत कर्ज व २० टक्के म्हणजेच रुपये ३० हजार अनुदान दिले जाते. वास्तविक बँकेचे व्याजदर विचारात घेता मिळालेल्या अनुदानापेक्षा व्याजापोटी जास्त पैसे भरावे लागतात मग हे व्यवसायासाठी बीज भांडवल कसे? खरंतर होतकरू तसेच प्रशिक्षित व सुशिक्षित बेरोजगार दिव्यांगांना व्यवसाय सुरू करण्यासाठी किमान ६० ते ७० हजार अनुदान दिले पाहिजेत.

दिव्यांग व्यक्ती स्वयंरोजगारातून स्वावलंबी व्हावेत आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने वावरता यावे म्हणून महाराष्ट्र शासनाने सन २००२ साली राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची स्थापना झाली. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व इतर मागासवर्ग महामंडळाच्या मदतीने आजपर्यंत काम चालत आहे. सुरुवातीला महामंडळाच्या बारा प्रकारच्या योजना होत्या आज फक्त दोन ते तीन प्रकारच्या योजना आहेत. गेल्या एकवीस वर्षांत दिव्यांग महामंडळाकडून पुणे जिल्ह्यातील फक्त ४६८ दिव्यांगांना कर्ज देण्यात आले आहे. इतर महामंडळाच्या तुलनेत दिव्यांग महामंडळाची वसुली चांगली असल्यामुळे भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने दोन वेळा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले आहे.

गरजू दिव्यांग व्यक्तींना हरित ऊर्जेवरील फिरत्या वाहनावरील दुकान मोफत देण्याबाबत शासन निर्णयानुसार राज्यातील ६६७ गरजू दिव्यांग व्यक्तींसाठी हरित ऊर्जेवर चालणार्या पर्यावरणस्नेही फिरत्या दुकानांचे जानेवारी २०२४ पर्यंत वाटप करण्याची शासनाने घोषणा केली आहे. राज्यातील बेरोजगार दिव्यांगांच्या संख्येच्या तुलनेत प्रत्येक जिल्ह्यात सरासरी १८-१९ वाहने येतात त्यात २१ प्रकारचे दिव्यांग आहेत. दिव्यांगत्वाच्या तीव्रतेनुसार प्राधान्यक्रम द्यायचे तर कोण पात्र ठरणार हे वाहन वितरण झाल्यावरच समजेल.

दिव्यांगांना स्वावलंबी करण्यासाठी रोजगाराबरोबरच स्वयंरोजगाराकडेही पाहिलं पाहिजे. उच्च शिक्षण तसेच योग्य व्यवसाय प्रशिक्षण घेऊनही रोजगार न मिळालेल्या दिव्यांगांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी जागा, स्टॉल, दुकान, माल खरेदीसाठी बीज भांडवल उपलब्ध केल्यास दिव्यांगांचे कायमस्वरूपी पुनर्वसन व्हायला मदत होईल.

# पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावर गटविकास अधिकारी अर्पिता ठुबे यांनी पंचायत समिती नावाचा बसवला नामफलक

केज/प्रतिनिधी केज पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावर गटविकास अधिकारी अर्पिता ठुबे यांनी पंचायत समिती नावाचा नामफलक बसवला आहे यामुळे पंचायत समिती कार्यालयामध्ये येणाऱ्या लोकांना आता पंचायत समिती कुठे आहे असे विचारण्याची गरज लागणार नाही. सदर नामफलक बोर्ड बसण्यासाठी जेसीबी मशीन आणण्यात आली होती. पंचायत समितीच्या प्रवेशद्वारावर जेसीबी मशीन दिसताच अतिक्रमण निघणार काय?अशा चर्चा तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांतून ऐकण्यास मिळाल्या आहेत. केज येथे न्यायालय, तहसील कार्यालय,पंचायत समिती पोलीस ठाणे,उपजिल्हा रुग्णालय यासह अनेक शासकीय कार्यालयाच्या इमारती या नवीन बांधण्यात आले आहेत. शासकीय नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे सदर कार्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वारावर कमानीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. शासकीय कार्यालयांच्या मोठमोठ्या इमारतीचे बांधकामे झालेले



आहेत परंतु सदर इमारतीमध्ये कोणते कार्यालय आहे हे त्या त्या कार्यालयात शासकीयकामानिमित्तयेणाऱ्यानागरिकांना कार्यालय माहीत नाही याचे कारण असे आहे की, कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या कमानीवर ज्या त्या शासकीय कार्यालयाचे नाम फलक असतील तर कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना कार्यालयाची ओळख होईल. नुकताच केज पंचायत समितीचा गट विकास अधिकारी पदाचा पदभार अर्पिता ठुबे मॅडम यांनी स्वीकारला आहे. गट विकास अधिकारी पदाचा पदभार स्वीकारताच अर्पिता ठुबे मॅडम यांनी ग्रामीण भागातील अनेक गावांना भेटी देऊन तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेत आजपर्यंत ग्रामीण भागात शासनाच्या योजना राबवल्या आहेत याची चौकशी करून पाहणी केली आहे. त्याचबरोबर पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वेळेत कार्यालयामध्ये उपस्थित राहणे व कार्यालयीन कामकाज वेळेत करण्यासंबंधी सूचना देऊन कार्यालयात येणाऱ्या लाभधारकांची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी कामाला लावले आहे. तसेच पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात व कार्यालयामध्ये झालेली घाण ही साफ करून स्वच्छ कार्यालय ठेवले आहे त्यामुळे नवनिर्वाचित गट विकास अधिकारी अर्पिता ठुबे मॅडम यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. पंचायत समितीच्या इमारतीचे गेले अनेक वर्षापासून बांधकाम पूर्ण झाले आहे व या नवीन इमारतीमध्ये कामकाज देखील चालू आहे परंतु या कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील कमनीवर पंचायत समिती कार्यालयाचा नाम फलक बोर्ड नव्हता. तत्कालीन गट विकास अधिकारी मोराळे साहेब यांच्या कार्यकाळामध्ये सदर नामफलक बोर्ड बसण्यासाठी संपूर्ण तयारी केले होते परंतु काही कारणास्तव अद्यापही सदर नामफलक बोर्ड बसवण्यात आला नव्हता परंतु नवनिर्वाचित गट विकास अधिकारी ठुबे मॅडम यांनी पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावरील कमानीवर पंचायत समिती नावाचा नाम फलक बसवला आहे.

# खा. बजरंग सोनवणेंवर पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करावा केजच्या पत्रकारांचे तहसीलदार, पोलीस निरीक्षकांना निवेदन

केज/प्रतिनिधी खा. बजरंग सोनवणे यांनी बीड येथील जाहीर कार्यक्रमात एका पत्रकाराच्या पत्नी, मुलगा व कुटुंबियांविरुद्ध अभद्र व अवमानकारक वक्तव्य करून पत्रकाराची मानहानी केली. या वक्तव्याचा केज येथील पत्रकारांनी काळ्या फिती लावून व घोषणाबाजी करीत याप्रकरणी खा. सोनवणे यांच्याविरुद्ध पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. अशी मागणी केज येथील पत्रकारांनी तहसीलदार व पोलीस निरीक्षकांकडे केली आहे. याबाबत केज येथील तहसीलदार व पोलीस निरीक्षकांकडे दिलेल्या निवेदनावर म्हटले आहे की, बीड येथील एका जाहीर कार्यक्रमात खा. बजरंग सोनवणे यांनी केज येथील एका पत्रकाराच्या बातमीचा संदर्भ देऊन त्यांच्या पत्नी, मुलगा व कुटुंबीयांवर अभद्र व अवमानकारक वक्तव्य करीत पत्रकाराची मानहानी केली. त्याचबरोबर खासदार महोदयांच्या वक्तव्याचे फेसबुकवरून अनैतिकपणे समर्थन करून त्यांचा कार्यकर्ता व पक्षाचा पदाधिकारी सुरज लक्ष्मण खोडसे (रा. नायगाव) याने देखील पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांची अपप्रतिष्ठा केली आहे. याप्रकरणी केज येथील पत्रकारांनी काळ्या फिती लावून घोषणाबाजी करीत निषेध व्यक्त केला. तर खा. बजरंग सोनवणे व सुरज खोडसे याच्याविरुद्ध पत्रकार संरक्षण कायदा



व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करून तात्काळ कायदेशीर कारवाई करावी. आठ दिवसात कारवाई न झाल्यास राज्यातील पत्रकारांना घेऊन राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा तहसीलदार व पोलीस निरीक्षकांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. याप्रकरणी खा. सोनवणे यांच्याविरुद्ध पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. अशी मागणी केज येथील पत्रकारांनी तहसीलदार व पोलीस निरीक्षकांकडे केली आहे.

# सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट बनाव मक्याच्या दाण्यांचे चविष्ट कॉर्न कटलेट, वाचा सिंपल रेसिपी

सकाळच्या घाईगडबडीमध्ये नाश्त्यासाठी नेमकं काय बनवावं हा प्रश्न सगळ्यांचं पडतो. अशावेळी काही लोक बाहेर विकत आणलेले पदार्थ खातात. पण सतत बाहेरचे पदार्थ खाल्यामुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे रोजच्या नाश्त्यात किंवा आहारात घरी बनवलेल्या पौष्टिक आणि आरोग्यदायी पदार्थांचे सेवन करण्यास प्राधान्य द्यावे. सकाळच्या वेळी पोटभर नाश्ता करणे ही आरोग्यदायी सवय आहे. नाश्ता केल्यामुळे पोटही भरलेले राहते आणि संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहामध्ये जातो. पोहे, उपमा, शिरा किंवा इडली डोसा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा निर्माण होते. अशावेळी तुम्ही कॉर्न टिक्की बनवू शकता. कॉर्न टिक्की बनवण्यासाठी जास्त



वेळ लागत नाही. कमीत कमी वेळात आणि साहित्यामध्ये कॉर्न टिक्की तयार होते. चला तर जाणून घेऊया कॉर्न टिक्की बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

मक्याचे उकडलेले दाणे
बटाटा
ब्रेडचा चुरा
हिरवी मिरची
कोथिंबीर
लाल तिखट
गरम मसाला
मीठ
तेल
कोथिंबीर
लिंबाचा रस

कृती:


कॉर्न कटलेट बनवण्यासाठी सर्वप्रथम, मक्याचे दाणे उकडवून मिक्समधून जाड बारीक वाटून घ्या.


बाऊलमध्ये मक्याचे बारीक करून घेतलेले दाणे, बारीक कापून घेतलेला बटाटा, बारीक चिरलेली हिरवी मिरची टाकून व्यवस्थित मिक्स करा.

त्यानंतर त्यात लाल तिखट, हळद, गरम मसाला, लिंबाचा रस, चवीनुसार मीठ, कोथिंबीर

# भारतात करोडो लोकांच्या पोटात पाण्यासह जातंय 'विष', आर्सेनिकयुक्त पाण्यामुळे चा धोका

भारतातील जलसंकटाच्या काळात आर्सेनिकयुक्त पाणी ही एक गंभीर समस्या सध्या होत असल्याचे दिसून येत आहे. भारत देशातील अर्ध्याहून अधिक राज्ये आर्सेनिकयुक्त पाण्याच्या या जीवघेण्या समस्येशी झुंज देत आहेत, जिथे लोक नकळत आर्सेनिकयुक्त पाणी पिऊन आपले आरोग्य धोक्यात घालत आहेत. आर्सेनिक हे एक विषारी रासायनिक घटक आहे, जे जास्त काळ पाण्यात सोडल्यास कर्करोगासारखे घातक रोग होऊ शकतात.





ए अँड एम युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ, टेक्सास, येथील संशोधकांच्या मते, आर्सेनिक युक्त पाणी मूत्रपिंडाच्या कर्करोगाचा धोका ६% वाढवते. अभ्यासामध्ये २०११ ते २०१९ पर्यंतच्या डेटाचे विश्लेषण करण्यात आले, ज्यामध्ये असे आढळून आले की आर्सेनिकच्या संपर्कामुळे मूत्रपिंडाच्या कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये ११.२% वाढ होत आहे. विश्लेषणादरम्यान, २० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सुमारे १ लाख व्यक्तींचा डेटा गोळा करण्यात आला. त्यात २८,००० हून अधिक कर्करोगाच्या प्रकरणे आढळून आली, ज्यापैकी अनेकांचा थेट संबंध आर्सेनिक-दूषित पाण्याशी होता, जाणून घ्या अधिक माहिती

भारतातील सद्यस्थिती

भारतातील आर्सेनिकयुक्त पाण्याचे संकट हे सध्या पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि आसाम या राज्यांमध्ये अधिक गंभीर असल्याचे चित्र आहे. एकट्या पश्चिम बंगालमध्ये सुमारे ९६ लाख लोक दूषित पाणी वापरत आहेत. बिहारमध्ये ही संख्या सुमारे १२ लाख आणि आसाममध्ये १६ लाख इतकी असल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे.

पवनानगर ग्रामस्थांवर दूषित पाणी पिण्याची वेळ; हाकेच्या अंतरावर धरण असूनही पाण्याच्या समस्येमुळे ग्रामस्थ संतप्त

आर्सेनिक पाण्यामुळे उद्भवणारे धोके


आर्सेनिक दूषित पाण्याचे सेवन केल्याने मूत्रपिंड, त्वचा, मूत्राशय आणि फुफ्फुसाचा कर्करोग होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेने मूत्रपिंडाचा कर्करोग हा जगातील सातवा सर्वात सामान्य कर्करोग मानला आहे. याशिवाय आर्सेनिक दूषित पाण्यामुळे त्वचेचे आजार, श्वसनाचे आजार आणि इतर गंभीर आरोग्य समस्याही उद्भवतात असे आता अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

कसे टाळता येईल

आर्सेनिकमुक्त पाण्यासाठी शासन स्तरावर जलशुद्धीकरण प्रकल्पांची गरज आहे. हँडपंप आणि टँकरच्या पाण्याची गुणवत्ता तपासावी हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे आणि यासाठी लोकांना जागरुक केले पाहिजे. तसेच, जलस्रोतांची नियमित स्वच्छता आणि सुधारणा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. याकडे सरकारनेही वेळीच लक्ष घालण्याची गरज आहे. अन्यथा भारतातील ही समस्या अनेक राज्यांमध्ये वाढत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर्षी पाण्याचा तुटवडा डिसेंबरपासूनच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अधिकाधिक त्रास होण्याची शक्यता आहे, याकडे वेळीच लक्ष द्यायला हवे.

# महिनाभर गोड खाऊ नका, नियमित १० हजार पावले चाला अन् फक्त घरचं अन्न खा; तज्ज्ञांकडून जाणून घ्या, आरोग्यावर कसा होईल सकारात्मक परिणाम

नवीन वर्षात अनेक जण नवे संकल्प करतात. सकाळी लवकर उठणे, वजन कमी करणे, नियमित पुस्तक वाचणे, व्यायाम करणे इत्यादी. काही लोकांचे संकल्प यशस्वी होतात आणि त्यांचे सकारात्मक परिणामसुद्धा दिसून येतात. तुम्ही कधी विचार केला का की, तुम्ही ३० दिवस गोड पदार्थांचे सेवन केले नाही, नियमित १०,००० पावले चाललात आणि फक्त घरी तयार केलेले अन्नाचे सेवन केले, तर काय बदल दिसू शकतो? तसेच तुम्ही नवीन वर्षामध्ये या गोष्टीचे अनुकरण केले, तर कोणते फायदे दिसून येतील? तर, आज आपण याबाबत सविस्तर जाणून घेऊ या दी इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांच्या हवाल्याने याबाबत सविस्तर माहिती सांगितली आहे. तज्ज्ञांच्या मते, गोड पदार्थ न खाणे, १० हजार पावले चालणे आणि ३० दिवस घरी तयार केलेले अन्न खाणे यांमुळे मोठा शारीरिक बदल दिसू शकतो. मुंबईच्या परळ येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलच्या इंटर्नल मेडिसीनच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. मंजुषा अग्रवाल सांगतात, हा चांगल्या सवयींचा एक भाग आहे की, जो अतिशय फायदेशीर ठरू शकतो आणि त्यामुळे अनेक प्रकारे आरोग्याचे फायदे मिळू शकतात. कोणते बदल दिसून येतात?



जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल, तर साखरेचे सेवन कमी करणे फायद्याचे ठरू शकते. सुरुवातीच्या दिवसांमध्ये तुम्हाला साखरेचे सेवन करण्याची इच्छा होईल आणि त्यामुळे तुम्ही गोंधळलेले दिसाल. कदाचित तुम्ही मूडी बनू शकता. कारण- रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी आणि संतुलित ठेवण्यासाठी थोडा वेळ लागतो. डॉ. अग्रवाल सांगतात, यादरम्यान ऊर्जा पातळीमध्ये हळूहळू नियमितपणा आणि स्थिरपणा दिसून येतो. आहार कसा असावा? साखरेचे कमी सेवन करणे, तसेच नियमित चालणे आणि घरी तयार केलेल्या अन्नाचे सेवन करण, यांसारख्या गोष्टी नियमित केल्याने वजन कमी होते आणि पचनक्रिया सुधारते. डॉ. अग्रवाल पुढे सांगतात, भरपूर भाज्या, फळे, शेंगा आणि व्हिटॅमिन्स, फायबर, ओमेगा-३ फॅटी ॲसिडस्, प्रोटीन्स व कार्बोहायड्रेट्स यांसारखे आवश्यक पोषक घटक असलेला आहार घेणे आवश्यक आहे. तज्ज्ञांचा सल्ला घ्या आहारात आवश्यक पोषक घटकांची कमतरता असेल, तर संपूर्ण आरोग्यावर परिणाम जाणवू शकतो. डॉ. अग्रवाल पुढे सांगतात, कोणताही नवीन बदल करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. ज्यांना मधुमेह आहे, उच्च रक्तदाब आहे त्यांनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा आणि त्यानंतर आवश्यक बदल करावा.

# सतत खुर्चीवर बसल्यामुळे पाठ आणि मान दुखते? मग सकाळी उठल्यानंतर नियमित करा 'ही' योगासने, मिळेल आराम

धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकदा आरोग्याकडे व्यवस्थित लक्ष देण्यास वेळ मिळत नाही. सतत काम करत राहिल्यामुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. ऑफिसमध्ये तासनतास एकाच जागेवर बसून राहिल्यामुळे अनेकदा पाठ आणि मान दुखण्यास सुरुवात होते. शिवाय चुकीच्या पद्धतीने झोपणे, तणाव इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. पाठ आणि मान दुखण्यास सुरुवात झाल्यानंतर दैनंदिन जीवनातील कामे करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. सतत पाठ आणि मानेचे दुखणे वाढल्यामुळे कोणतेही काम करण्याची इच्छा निर्माण होत नाही.





त्यामुळे आज आम्ही तुम्हाला पाठ आणि मानेच्या दुखण्यांपासून आराम मिळवण्यासाठी काही सोपी योगासने सांगणार आहोत. ही योगासने सकाळी उठल्यानंतर नियमित केल्यास पाठ आणि मानेच्या दुखण्यांपासून आराम मिळण्यास मदत होईल.

पाठ आणि मानेच्या दुखण्यांपासून आराम मिळवण्यासाठी नियमित करा ही योगासने:

ताडासन:ताडासन केल्यामुळे दैनंदिन जीवनातील आरोग्यासंबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळण्यास मदत होईल. ताडासन करताना शरीर आणि पाठीचा कणा ताठ ठेवावा. यामुळे पाठ आणि मानेच्या दुखण्यांपासून आराम मिळण्यास मदत होईल.

भुजंगासन:

भुजंगासन नियमित केल्यामुळे पाठीचा कणा ताठ होण्यास मदत होईल. शिवाय पाठीचे स्नायू मजबूत होतील. हे आसन नियमित केल्यामुळे मणका लवचिक बनतो.

शशांकासन:पाठीच्या स्नायूंना एअरमन देण्यासाठी नियमित शशांकासन करावे. हे आसन तुम्ही घर बसल्यासुद्धा करू शकता. यामुळे पाठ आणि मानेवर आलेला तणाव कमी होईल. योगासन करण्याचे फायदे:

निरोगी जीवनशैली जगण्यासाठी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. व्यायाम केल्यामुळे शरीराचे स्नायू मजबूत आणि लवचिक होतात. शिवाय आरोग्याला अनेक फायदे होतात. नियमित योगासने केल्यामुळे पाठीचे आणि मानेचे स्नायू लवचिक होतात, रक्ताभिसरण सुधारते आणि मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते. सकाळी उठल्यानंतर नियमित व्यायाम केल्यामुळे मान आणि पाठीचा कणा लवचिक होईल.

व्यायाम करताना कोणती काळजी घ्यावी:

सकाळी उठल्यानंतर व्यायाम करण्याआधी नियमित वर्म अप करणे आवश्यक आहे. वर्म अप केल्यानंतर व्यायाम करावा. यामुळे शरीराला दुखापत होत नाही. पहिल्यांदा योगा करताना प्रशिक्षकांचे योग्य ते मार्गदर्शन घ्यावे, ज्यामुळे शरीराला कोणतीही इजा होणार नाही. कोणत्याही गंभीर आजाराने किंवा दुखापतीने त्रस्त असाल तर योगासने करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. योगासने करताना आधी हळूहळू सर्व व्यायाम प्रकार शिकून घ्यावेत. त्यानंतर हळूहळू एक व्यायाम प्रकारात वाढ करावी.

# उमंग सेंटरने फ्लॅश मॉब स्ट्रीट प्लेच्या माध्यमातून जनजागृती केली










लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहरात फ्लॅश मॉब पथनाट्यांचा समावेश असलेला अपंगत्व जनजागृती कार्यक्रम अनमोल सागर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पाठबळाखाली यशस्वीपणे पार पडला. जागतिक अपंग दिनानिमित्त उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम अँड मल्टीडिसेबिलिटी रिसर्च सेंटर, लातूरच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी फ्लॅश मॉब पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश अपंगत्व, प्रतिबंध, लवकर ओळख आणि लवकर हस्तक्षेप याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.

क्रिडा संकुल, जिल्हा परिषद लातूर, कलेक्टर ऑफीस लातूर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर मध्यवर्तीय बसस्थानक, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल लातूर, गांधी चौक, गंज गोलाई, विवेकानंद चौक, एमआयटी कॉलेजसह अनेक ठिकाणी आयोजित पथनाट्याच्या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती. हजारो लोक उत्साही आणि माहितीपूर्ण कामगिरी पाहण्यासाठी जमले होते, ज्याने अपंगत्व जागृतीबद्दल महत्त्वपूर्ण संदेश दिला. कार्यक्रमाचा अविभाज्य भाग असलेल्या फ्लॅश मॉब पोस्टर प्रेझेंटेशनने अपंगत्व रोखण्यासाठी लवकर ओळख आणि हस्तक्षेपाचे महत्त्व प्रभावीपणे सांगितले. पोस्टर्समध्ये अपंग लोकांसाठी सर्वसमावेशकता, सुलभता आणि समान संधींची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. फ्लॅश मॉब स्ट्रीट प्ले, पोस्टर प्रेझेंटेशन आणि इतर उपक्रमांचा समावेश असलेल्या जनजागृती कार्यक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषद लातूर व उमंग सेंटरने सोबत जवळून काम केले. या सेंटरचे यश हे अपंग-समावेशक समाज निर्माण करण्याच्या जिल्हा परिषद लातूरच्या वचनबद्धतेचा दाखला आहे. अपंगत्व जनजागृती आणि अपंग व्यक्तींना पाठिंबा देण्यासाठी उमंग सेंटरचे प्रयत्न खरोखरच प्रशंसनीय आहेत आमच्या पथनाट्याच्या कार्यक्रमाला मिळालेल्या प्रतिसादाने आम्ही भारावून गेलो आहोत, उमंग सेंटरचे संचालक डॉ. प्रशांत उटगे म्हणाले अपंग लोकांसाठी संवेदनशील आणि आधार देणारा समाज निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी जागरूकता आणि शिक्षण या गुरुकिल्ल्या आहेत यावर आमचा विश्वास आहे. या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि उमंग सेंटरने अपंगत्वाबाबत जनजागृती करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक केले. या कार्यक्रमात पोलीस प्रशासन, स्थानिक मान्यवरांनीही सहभाग नोंदवून या उपक्रमाला आपला पाठिंबा व्यक्त केला. या अभिनव उपक्रमाने उमंग सेंटरने शहरातील अपंग जनजागृती मोहिमेचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. जनजागृती कार्यक्रमास केशव नेटके निवासी जिल्हा उप-अधिकारी, प्रियंका आयरे जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्षा मनाळे महसुल तहसिलदार, उमंगचे सचिव श्री.किरण उटगे, डॉ. श्रीशैलम तलारी, डॉ.वैभव उटगे, डॉ.प्रतिक केंद्रे, डॉ.आंचल बांते, डॉ.अर्जुन राठोड, श्री.गणेश डोंगरे, किरण कांबळे, डॉ.शिवानी पाटील, डॉ.प्रविण राठोड, डॉ.भक्ती गोजमगुंडे, डॉ.तेजस्विनी लकडे, डॉ. सनोबर तांबोळी, अर्पणा बेंबळगे, उमंगचे व्यवस्थापक ड.श्रीहरी गोरे, माणिक करमले, विवेक हनवते, हरीश पाटील, रामेश्वर जाधव आणि उमंग टीम यांनी उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीने आणि सक्रिय सहभागाने या कार्यक्रमात मोठी भर पडली.

## काही लोकांच्या हसण्यातही अपार वेदना दडलेल्या असतात- समाजभूषण उत्तम तरकसे

पनवेल / प्रतिनिधी :- कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पनवेल च्या वतीने तथास्तु हॉल नील समृद्धी अशोका गार्डन पनवेल येथे ॲड सौ.माधुरी राजन थळकर यांच्या दोन पुस्तकाचे प्रकाशन सोहळा मा. नमिता कीर (केंद्रीय अध्यक्ष कोमसाप) मा. सुधीर शेठ (रायगड जिल्हा अध्यक्ष कोमसाप) मा. ए के शेख (ज्येष्ठ गजलकार) मा. एॲाड सुनिता जोशी (ज्येष्ठ साहित्यिका) मा रोहिदास पोटे (साहित्यिक समीक्षक व गझलकार) यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात प्रकाशन सोहळा पार पडला






सदर कार्यक्रमास समाजभूषण मा श्री उत्तम दासु तरकसे आसरडोहकर( महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे आवर्जून हजर होते त्यांनी आपले मनोगत मांडताना माधुरीताई वकील व मी पोलीस आहे आमच्या समोर तक्रारी स्वरूपात अनेक कथा उभे असतात परंतु आपण जे दिसते त्या पाठीमागचे जाणणे गरजेचे आहे कारण प्रत्येक जण रडूनच दुःखाला सामोरे जातो असे नाही तर काहींच्या हसण्यातही अपार वेदना दडलेल्या असतात ते आपण जाणून मांडल्या पाहिजेत असे मोलाचे मार्गदर्शनपर भावना व्यक्त केल्या

सदर कार्यक्रमास सभागृह अगदी साहित्यिक वर्गाने फुलून गेला होता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष कुडके (साहित्यिक) यांनी खूप उत्तम प्रकारे सादरीकरण केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन तळेकर मॅडम यांच्या सून सौ तळेकर यांनी सर्व उपस्थित प्रमुख पाहुणे व साहित्यिक वर्गांचे आभार मानून सर्वांनी स्नेहा भोजनाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

## लातूरच्या अनुराधा टेकाळे हीची राज्याच्या शालेय हॉकी संघात निवड

**मध्यप्रदेश राज्यातील मंदसौर येथे होणाऱ्या राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व**

लातूर / प्रतिनिधी :- जिल्ह्यातील बिंदगीहाळ येथील हनुमान विद्यालयात ८ वी वर्गात शिक्षण घेत असलेली उदयोन्मुख खेळाडू कु.अनुराधा नवनाथ टेकाळे हीची १४ वर्ष वयोगटातील महाराष्ट्र राज्याच्या हॉकी संघात निवड झाली आहे. इस्लामपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत अनुराधा टेकाळेची निवड करण्यात आली. बिंदगीहाळ येथील हनुमान विद्यालयाच्या हॉकी संघाने नेहमीच आपला दबदबा राखला आहे. आतापर्यंत २ खेळाडूंनी राष्ट्रीय तर २०० च्या वर खेळाडूंनी राज्यस्तरावर लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले आहे. कु. अनुराधा ही ८ वी वर्गात शिक्षण घेत आहे. येत्या ९ ते १३ डिसेंबर २०२४ या दरम्यान मध्यप्रदेश राज्यातील मंदसौर येथे होत असलेल्या राष्ट्रीय शालेय हॉकी स्पर्धेत अनुराधा महाराष्ट्राच्या संघाचे प्रतिनिधित्व करेल. तत्पूर्वी ५ ते ८ डिसेंबर २०२४ रोजी यवतमाळ येथे होत असलेल्या शिबिरात भाग घेण्यासाठी ती रवाना होण्यापूर्वी माझं लातूर परिवाराच्या वतीने तिचा पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सतीश तांदळे,हॉकी संघाचे मार्गदर्शक काकासाहेब शिंदे आणि तिची आई उपस्थित होती. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अनुराधाने मिळविलेले हे यश इतर खेळाडूंना प्रेरणा देणारे आहे. अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात जन्म, वडिलांचे छत्र हरवलेले, क्रीडा साहित्याचा अभाव, मैदान,



गणवेश अशा अनेक संकटांवर मात करून जिद्द आणि चिकाटीच्या बळावर तिने हे यश मिळविले आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी बिंदगीहाळ येथील या हॉकी संघाचे माझं लातूर परिवाराने पालकत्व स्वीकारले आहे. या होतकरु खेळाडूंना आवश्यक क्रीडा साहित्य वेळोवेळी पुरवून भक्कम आधार देण्याचे कार्य माझं लातूरने केले आहे. परिवाराच्या वतीने अनुराधा हिला शुभेच्छा देण्यात आल्या.

## ईव्हीएम विरोधी जनआंदोलन स्वाक्षरी मोहीमेत मतदारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. - विनोद खटके यांचे मतदारांना आवाहन

लातूर :- वंचित बहुजन आघाडी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब तथा ड.प्रकाश आंबेडकर यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात *ईव्हीएम विरोधी जनआंदोलन स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे त्या अनुषंगाने लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते विनोद खटके यांच्या हस्ते व लातूर ग्रामीण विधानसभेचे उमेदवार डॉ. विजय अजनीकर यांच्या उपस्थितीत ईव्हीएम विरोधी जनआंदोलन स्वाक्षरी मोहीमीची सुरुवात दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता विवेकानंद चौक,लातूर येथे करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडी जिल्हा महासचिव ड.रोहित सोमवंशी, शहर महिला अध्यक्ष सुजाताताई




अजनीकर, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष अमोल बनसोडे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुरेश सूर्यवंशी,शहर महासचिव आकाश इंगळे, किसन कांबळे, सुरेश कल्लेकर, अजय सूर्यवंशी,दगडू सोनकांबळे,आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने या स्वाक्षरी मोहिमेस उपस्थित होते.

## माहूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांचे दुर्लक्ष, पंचायत समिती कार्यालय घाणीच्या विळख्यात

किनवट/शेख शौकत:- माहूर तालुक्यातील शंभरावर गावांचा गाव गाडा चालविण्यासाठी प्रशासकीय इमारतीत असलेल्या पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी सुरेश कांबळे यांचा वचक राहिला नसल्याने घाणीचे साम्राज्य पसरले असून कामासाठी कार्यालयात येणाऱ्या महिलांसाठी स्वच्छतागृह नसल्याने महिला सह पुरुषांनाही उघड्यावर लघुशंका करावी लागत असून येथे असलेले कर्मचारी आणि आलेले नागरिक इमारतीच्या कानाकोपऱ्यात खर्रा गुटखा पुड्या खाऊन पिचकाऱ्या मारत भिंतीवर शासकीय जाहिराती रेखाटल्यागत व्यंगचित्र उभारले असल्याने गटविकास अधिकारी सुरेश कांबळे यांनी तात्काळ कार्यालयाच्या स्वच्छतेसह स्वच्छतागृह अद्यावत करावे अशी मागणी होत आहे. माहूर तालुका पंचायत समिती कार्यालयाची इमारत सुसज्ज असून येथे पाणीपुरवठा नसल्याने कामासाठी आलेल्या नागरिकांना शौच किंवा लघु शंका आल्यास त्यांनी कार्यालयाचे खालच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत उघड्यावर जावे लागते दस्तूर खुद्द अनेक कर्मचारी प्रशासकीय इमारतीच्या वरच्या मजल्यावर जाऊन स्लॅबवरच लघु शंका करतात त्यामुळे येथे प्रचंड दुर्गंध पसरली असून कार्यालयाचे जागेत असलेल्या लघुशंका गृह शौचालयांचे दरवाजे तुटले असून येथे नागरिक नको त्या ठिकाणी घाण करून जात असल्याने या स्वच्छतागृहात गेलेल्या महिला नाका तोंडाला पदर लावून बाहेर येत उघड्यावर लघु शंकेसाठी जात असल्याने त्या महिलांच्या सोबत आलेल्या नागरिकांना शरमेने मान खाली घालून बाजूला उभे राहावे लागते. कार्यालयात असलेले कर्मचारी तसेच येणार हजारो नागरिक वेळेवर अधिकारी कर्मचारी मिळत त्यांच्या नावे शिव्या देत तोंडात असलेला खरा आणि गुटखा पुड्याच्या पिचकाऱ्या कार्यालयाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात मारून शासकीय जाहिरातीतील व्यंगचित्र रेखाटल्याप्रमाणे भिंती आणि कोपरे रंगवत असून लोखंडी जाळ्यावरही खरा पुड्या खाऊन थुकलेले दिसत असल्याने शांत प्रिय निर्वसनी नागरिक कार्यालयात आल्यानंतर कुठलेही भीतीला टेका देऊन तसेच जाळीवर हात लावून उभे न राहता सावधान



उभे राहूनच कार्यालयातून काढता पाय घेत आहेत. कार्यालयात अनेक ठिकाणी जुनी भंगार साहित्य अस्तव्यस्त फेकून दिलेले असून कार्यालयावर जाणाऱ्या पायऱ्याखाली प्रचंड भंगार जमा झालेले असताना याकडे कोषागार अधिकारी तहसीलदार किंवा गटविकास अधिकारी यापैकी कोणीही लक्ष देत नसल्याने कार्यालयात डासांचा प्रदुर्भाव होत आहे अनेक वर्ष झाले तरीही या कार्यालयाला अद्याप पाणीपुरवठा झाला नसल्याने नगरपंचायतचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी तात्काळ लक्ष घालून येथे पाणीपुरवठा करत तहसीलदार गटविकास अधिकारी यांनी कार्यालयांच्या स्वच्छतेकडे लक्ष घालून स्वच्छतागृह अद्यावत करून परिसराची स्वच्छता तत्काळ करावी अशी मागणी नागरिकातून होत आहे.

## ६ डिसेंबर रोजी सामूहिक महा बुध्द वंदना.

लातूर :- भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री बहुजनांचे कैवारी महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण ०६ डिसेंबर १९५६ साली झाले. या दुःख दायी घटनेस आज मितीस ६८ वर्ष पूर्ण झाले आहेत. मुंबई दादर येथील अंतिम संस्कार केलेल्या चैत्यभूमी ठिकाणी लाखोंच्या संख्येने आंबेडकरी अनुयायी उपस्थित राहून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतात. तेव्हा समस्त लातूर येथील आंबेडकरी अनुयायांच्या वतीने प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी ०६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ७-३० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर या ठिकाणी सामूहिक महाबुध्द वंदना अभिवादन कार्यक्रम आयोजित केला आहे. याकरिता सर्व आंबेडकरी अनुयायांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून अभिवादन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन भिक्खु पय्यानंद थेरो व अभिवादन कार्यक्रम सुकाणु समितीच्या वतीने करण्यात आले आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकराना महा परिनिर्वाण दिनी वैचारिक आणि कृतिशील पद्धतीने अभिवादन करणे हे कर्तव्य लक्ष ठेऊन भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर शहरातील विविध नगरांमध्ये भिक्खु संघ आणि महा बुध्द



वंदना सुकाणु समितीचे सर्व सदस्य पायी फिरुन सर्वांना या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले आहे. अभिवादन कार्यक्रमास येताना सर्वांनी गरजूवंत विध्यार्थ्यांसाठी पेन वही घेऊन यावे आणि पांढरे वस्त्र परिधान करून येणे अनिवार्य असल्याचेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे. कार्यक्रम यशस्वीते साठी भंते बुध्दशिल, भंते बोधीराज, मिलिंद धावारे, उदय सोनवणे, पांडुरंग अंबुलगेकर, अनिरुध्द बनसोडे,विनोद कोल्हे ज्योतीराम लामतुरे, प्रा.सतिश कांबळे,सिद्धार्थ सूर्यवंशी,अंतेश्वर थोटे,राहुल शाक्यमुनी, निलेश बनसोडे,विशाल वाहुळे,डॉ.अरुण कांबळे, चंद्रसेन भडके,शिवाजी सोनकांबळे,अशोक कांबळे,डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. देवदत्त सावंत, करण ओहळ,पंचशीला बनसोडे, अंजली सोनकांबळे, रेखा सुरवसे, कांता काकडे, सरिता बनसोडे, शिल्पा सोनवणे, शारदा लामतुरे, कविता धावारे, त्रिशाला घोडके, संगीता कांबळे आणि सामूहिक महा बुध्द वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणु समितीच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE